REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ६ सप्टेंबर, १९४४ अंक ३६

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

### पुणें शहर

**भांडवल :**

( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमूख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरीः** ओरिएण्टल बिल्डिंग्ज मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिल्लकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें

# विविध माहिती

### हिंदी साखरेचें उत्पादन

साखरेच्या १९४२-४३ च्या हंगामांत १२½ लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें, असा अंदाज आहे. हिंदुस्थानांतील साखरेच्या उत्पादनाचा हा उच्चांक आहे. चालू वर्षी उत्पादन १२ लक्ष, १० हजार टन होईल, अशी अपेक्षा आहे. जावा, फिलिपाइन्स व रशिया येथील साखरेचें उत्पादन जागतिक बाजार-पेठांत आणखी कांहीं वर्षें येणें अशक्य असल्याकारणानें, हिंदी साखर कारखान्यांची तेजी इतक्यांत संपणार नाहीं, असें श्री. एम्. पी. गांधी ह्यांचें मत आहे.

### काश्मीरमध्यें रेशमाचा धंदा

काश्मीर संस्थानांत तुतीची लागवड करून रेशमाचा धंदा मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचा प्रयत्न चालू आहे. रेशमी धागे तयार करणारा कारखाना काढण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत.

### बँकांतील सरकारी नोकरांच्या रकमा

लाचलुचपतीचा ज्या सरकारी नोकरांवर आरोप आहे अशांच्या बँकांतील व इतर संस्थांतील रकमा त्यांस मिळूं नयेत अशी व्यवस्था करण्यांत येणार आहे, असें समजतें. खटला संपल्यावर आरोपीस शिक्षा झाली तर ह्या रकमा जप्त करण्यांत येतील.

### दक्षिण आफ्रिकेची कोळशाची निर्यात

दक्षिण आफ्रिका दरमहा ४ लक्ष टन कोळसा संयुक्त राष्ट्रांकडे निर्गत करीत आहे.

### "कोल प्रॉडक्शन फंड"

ब्रिटिश हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या किंवा बाहेरून अथवा संस्थानी हद्दींतून ब्रिटिश हद्दींत येणाऱ्या कोळशावर पट्टी बसविण्यांत आली आहे, तिचा विनियोग कोळशाचें उत्पादन, विक्री व वाटप ह्यांत सुधारणा करण्याकडे होईल.

### निजाम सरकारची २ अब्ज रुपयांची योजना

उद्योगधंदे, शिक्षण व आरोग्य ह्यांत वाढ करण्यासाठी निजाम सरकारनें २ अब्ज रुपये खर्चाचा १४ वर्षांचा एक कार्यक्रम आखला आहे.

### शेती सुधारण्यासाठी ३५ हजार नोकर हवेत

सर पी. एम्. खारेघाट, हिंदुस्थान सरकारच्या शेती खात्याचे ॲडि. सेक्रेटरी, ह्यांनीं तयार केलेल्या शेती विस्ताराच्या योजनेसाठीं तज्ज्ञ व इतर लोक मिळून ३५ हजार नोकर नेमावे लागतील. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या शेतकी खात्यांत सध्या एकूण ४ हजारच नोकर आहेत. ही प्रचंड तूट भरून काढण्याची कोशीस करण्यांत येईल.

### पेटंटसाठी फक्त शेड्यूल्ड बँकांचे चेक

कंट्रोलर ऑफ पेटंट्स अँड डिझाइन्स, कलकत्ता, ह्यांकडे पाठविण्याची फी इतके दिवस कलकत्ता शहराबाहेरील बिगर शेड्यूल्ड बँकांवरील चेकमार्फत धाडली तरी चालत असे. ह्यापुढें फक्त शेड्यूल्ड बँकांवरलिच चेक स्वीकारण्यांत येतील.

### बंगाल-नागपूर रेल्वे सरकार घेणार

बंगाल-नागपूर रेल्वेचा हिंदुस्थान सरकारबरोबरचा करार सप्टेंबर, १९४४ अखेर संपत आहे. तो वाढविण्यांत येणार नाहीं. म्हणजे हिंदुस्थानांतील सर्व मोठ्या खासगी कंपन्यांच्या रेल्वेज आतां सरकारी मालकीच्या होतील.

### युद्धकालीन हिंदी बँकिंग

"हिंदुस्थानांत चालू युद्ध सुरू झाल्यापासून बँकिंगची पुष्कळच वाढ झालेली आहे. परंतु बँकांस कर्जें घेणारे फारसे भेटत नाहींत. त्यामुळें सरकारी रोख्यांतील पैशाच्या गुंतवणुकांवरच त्यांचा नफा अवलंबून आहे. ज्या प्रमाणांत सरकारी रोख्यांचा त्यांस आश्रय करावा लागतो, त्या प्रमाणांत त्या बँका राहिल्या नसून त्या इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट बनल्या आहेत. चालू युद्धास प्रारंभ होण्यापूर्वी बँकांजवळील चालू ठेवी व कायम ठेवी ह्या सारख्याच प्रमाणांत होत्या; आतां बँकांच्या ठेवींपैकी तीनचतुर्थांश ठेवी चालू खात्यावरच्या आहेत. लोकांना आपले पैसे सहज काढतां येतील असे ठेवावयास पाहिजे आहेत. हिंदी बँकांना फारसा नफा झालेला नाहीं. कांहीं बँकांच्या नोकरवर्गास पगार चांगला मिळत असला, तरी साधारणपणें हा नोकरवर्ग पिळलाच जास्त गेला आहे.":—प्रो. मुरंजन ह्यांचें भाषण.


THE BANK OF MAHARASHTRA, Ltd. POONA.

## NOTICE.

Notice is hereby given that an Extra Ordinary General Meeting of the shareholders of the Bank will be held at the Registered Office of the Bank, Kakakuwa Mansion, Laxmi Road, Poona City, on Sunday the 8th October 1944 at 4 P. M. to consider and if thought fit to pass the following resolutions amending the Memorandum and Articles of Association of the Bank, which will be moved as special resolutions.

**Resolution No. 1** :—"Resolved that the Authorised Capital of the Bank be raised from Rs. 10,00,000/- divided in to 20,000 shares of Rs. 50/- each to Rs. 50,00,000/- divided into 1,00,000 shares of Rs. 50/- each and that clause No. 5 of the Memorandum and Article No. 4 of the Articles of Association of the Bank be amended accordingly."

**Resolution No. 2** :—"Resolved that in Article 80 the figure '250' be substituted in place of '100'.

**Resolution No. 3** :—"Resolved that the following Article be substituted in place of the existing Article 94."

"94. That the qualification of a Director shall be his holding at least 250 shares in the Company of the nominal value of Rs. 12,500/- in his own right and not jointly with any other person or persons."

By Order of the Board,

Poona City, 28th August 1944. C. V. Joag, *Manager.*

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from the 4th day of October to the 14th day of October 1944, both days inclusive.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ... २८२ |
| २ चलन परिषदेच्या निर्णयाचे परिणाम | ... २८३ |
| ३ शेअर बाजार... | ... २८४ |
| ४ स्फुट विचार ... | ... २८५ |
| हिंदुस्थानास योग्य स्थान नाहीं !—शेती सुधारणा की औद्योगिक सुधारणा—स्वतःचें शेपूट पकडण्याचा कुत्र्याचा प्रयत्न—इंग्लंडची मदत घ्या—महाराष्ट्र बँकेच्या भांडवलांत वाढ. | |
| ५ इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचा विस्तार | ... २८७ |

अर्थ

बुधवार, ता. ६ सप्टेंबर, १९४४

## चलन-परिषदेच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम

आंतर-राष्ट्रीय हुंडणावळीची व्यवस्था आणि जागतिक चलन पद्धति ह्यांची घडी युद्धोत्तर परिस्थितीच्या समाधानकारक आर्थिक घटनेच्या दृष्टीनें नीट बसवावी ह्या हेतूनें इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांच्या प्रेरणेनें अमेरिकेंत एक परिषद बोलावण्यांत आली होती आणि तिच्या चर्चेंत हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला ह्याची माहिती आम्हीं दिलीच आहे. हिंदी प्रतिनिधींनीं ह्या देशाच्या हिताच्या दृष्टीनें, विशेषतः त्याच्या लंडनमध्यें साठलेल्या स्टर्लिंग बाकयांच्या योग्य विनियोगाबाबत केलेल्या सूचना चलन-परिषदेनें कशा फेटाळून लावल्या हेंहि आम्हीं सांगितलें आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं हिंदी प्रतिनिधींस जागतिक चलन परिषदेंतून हात हालवीत परत यावें लागलें आहे, कारण त्यांच्या कोणत्याच सूचना ग्राह्य समजल्या गेल्या नाहींत आणि मोठ्या बहुमतानें त्या अमान्य ठरवल्या गेल्या. श्री. श्रॉफ आणि सर षण्मुखम् चेट्टी हिंदुस्थानांत परत आले असून त्यांनीं चलन-परिषदेच्या कार्याचा वृत्तांत आपल्या देशबांधवांस मोकळ्या मनानें निवेदन केला आहे. जाहीर दिलेल्या मुलाखतींत आणि केलेल्या निवेदनांत त्यांनीं स्वतःची निराशा वेशीवर टांगली आहे आणि ह्या परिस्थितींतहि हिंदुस्थान सरकार व हिंदी जनता ह्यांनीं काय करणें अगत्याचें आहे ह्याची रूपरेखा आखली आहे. स्टर्लिंगमधील शिलकेपैकीं कांहीं भागाचे डॉलर्स मिळवण्याची सवड, जागतिक गंगाजळीचा उपयोग हिंदी उद्योगधंद्यांस भांडवल पुरवण्याकडे केला जाण्याची तजवीज, गंगाजळीच्या कारभारासाठी नेमल्या जावयाच्या मंडळांत ह्या देशाच्या प्रतिनिधींचा समावेश होण्याची आवश्यकता, इत्यादि बाबतींत हिंदी प्रतिनिधींनीं परिषदेपुढें मांडलेले मुद्दे व्यर्थ गेले. असें आहे तरी प्रस्तुत परिस्थिति आणिक बिघडूं नये म्हणून हिंदुस्थान सरकार व हिंदी धंदेवाले ह्यांनीं कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे ह्याविषयीं श्री. श्रॉफ आणि सर षण्मुखम् ह्यांनीं महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय चलन गंगाजळीच्या योजनेंत असें एक कलम आहे कीं तीमध्यें भाग घेणाऱ्या सभासदांनीं युद्धसमाप्तीनंतरच्या चारपांच वर्षांत त्यांचेवर येणाऱ्या जबाबदाऱ्या ह्या संधिकाळांत पार न पाडल्या तरी चालेल. ह्या जबाबदारींपैकी एक बाब राष्ट्रीय चलनाच्या मोबदल्यांत इतर राष्ट्रांच्या चलनांतील हुंड्या देण्यासंबंधांतली आहे. ह्या कलमास अनुसरून चालू व्यवहारांत उत्पन्न होणाऱ्या देण्याच्या फेडीसाठी इतर राष्ट्रांवर हुंड्या देण्याचें राष्ट्रांस नाकारतां येईल. उदाहरणार्थ, हिंदुस्थानचें इंग्लंडला होणारें देणें स्टर्लिंगमध्यें जमा होईल त्याचे डॉलर्स ह्या देशाच्या सोईप्रमाणें व मागणीप्रमाणें देण्यास इंग्लंडवर बंधन रहाणार नाहीं. हा प्रश्न चलन-परिषदेंत श्री. श्रॉफ व सर षण्मुखम् ह्यांनीं ब्रिटिश प्रतिनिधींपुढें मांडला असतां त्यांनीं युद्धसमाप्तीनंतर तीन ते पाच वर्षेंपर्यंत इंग्लंड हिंदुस्थानच्या देण्यापैकी स्टर्लिंगबद्दल इतर देशांवर हुंड्या देणार नाहीं असें रोखठोक उत्तर दिलें. हिंदुस्थानच्या शिलका लंडनमध्यें साचल्या आहेत आणि साचत आहेत, त्यांची योग्य विल्हेवाट ह्या देशाच्या सोयीप्रमाणें लावली जाण्याबाबत मागणी जोरानें होत आहे त्याचवेळीं युद्धसमाप्तीनंतरहि त्या शिलकांत कित्येक वर्षें भर पडत रहाणार आणि सध्याची अडचण अधिक कठिण होणार हें उघड आहे. ह्या स्थितीवर उचित उपाय योजण्याचें अगत्य हिंदी प्रतिनिधींनीं प्रतिपादलें आहे. हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकाराशीं बोलणें करून सद्रहु प्रश्नाचा तातडीनें समाधानकारक निकाल लावून घ्यावा असें त्यांचें कळकळीचें सांगणें आहे.

त्यांची दुसरी सूचना ब्रिटिश साम्राज्याची म्हणून एक डॉलरची गंगाजळी निर्माण केलेली आहे आणि तीमध्यें हिंदुस्थान धरून साम्राज्यांतर्गत देशांचें देणें झालेले डॉलर्स अंतर्भूत करण्यांत आलेले आहेत, तिचेविषयीं आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थानास अमेरिकेकडून येणारा पैसा डॉलर्सच्या स्वरूपांत मिळाला पाहिजे, पण अशा सर्व डॉलर्सचा एकूण फंड केवढा आहे आणि हिंदुस्थानचा भाग किती आहे ह्याची माहिती प्रसिद्ध झालेली नाहीं. ब्रिटिश सरकार स्वतःच्या धोरणास अनुसरून ह्या फंडांतल्या डॉलर्सचा उपयोग करतें आणि त्या प्रमाणांत हिंदुस्थानसारख्या देशांच्या डॉलर्सची रकम किती शिल्लक आहे हें समजत नाहीं. ह्याविषयींची माहिती आपण ती मुद्दाम मागितली असतांहि पुरवण्यांत आली नाहीं आणि हें युद्ध गुपित असल्याचें कारण पुढें करण्यांत आलें असें श्री. श्रॉफ व सर षण्मुखम् ह्यांचें म्हणणें आहे. युद्धसमाप्तीबरोबर डॉलर संग्रह बंद करावा आणि प्रत्येक साम्राज्यांतर्गत देशास त्याच्या येण्याच्या प्रमाणांत त्यांतली शिल्लक वाटून देण्यांत यावी अशी सूचना त्यांनीं केली आहे. हिंदी फडनविसांनीं युद्धोत्तर औद्योगिक संवर्धनासाठी डॉलर्सचा संचय करण्यांत येत असल्याचें सांगितलें आहे खरें, पण ह्या संग्रहांत किती रकमा टाकल्या आहेत आणि हिंदुस्थानच्या अमेरिकेकडून येणें झालेल्या पैशाशीं त्याचें काय प्रमाण आहे हें सरकारनें जनतेस सांगितलें पाहिजे अशी त्यांची मागणी आहे. आपल्या देशाची बाजू निस्पृहपणानें हिंदी प्रतिनिधींनीं चलन-परिषदेंत आणि येथें मांडल्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. तेथें उपस्थित असलेल्या इतर राष्ट्रांच्या प्रतिनिधि मंडळांचें प्रमुखत्व तद्देशीय नागरिकांकडे होतें. हिंदुस्थान ह्या नियमास अपवाद होता ह्या घटनेकडे त्यांनीं लक्ष वेधलें आहे ही मोठ चिंतनीय आहे.

---

## शेअर बाजार

( श्री. व. त्रि. टोणकर, एम. ए., बी. कॉम.,
२४ डे. जि. पुणें, ४ )

दोस्त सैन्यांचे सर्व आघाड्यांवरील आगे कुच, रुमेनिया, बल्गेरिया यांच्या तहाच्या बातम्या, टाईगचे सहामाही रु. २५ च व्याज व टेक्स्टाईल बोर्डानें कमी केलेले कापडाचे व सुताचे भाव या मंदीवाल्यांना मिळालेल्या अनुकूल घटनांनीं सर्व बाजार खालीं घातले आहेत. टाईग १७७२।८, नागपूर, ३८७, गोकाक २९१, कोहिनूर ५७८, स्वदेशी ४९९, डिफर्ड २०८२।८ ऑर्डिनरी ३९० असे प्रमुख भाव शुक्रवारीं संध्याकाळीं बंद राहिले. नेहमीप्रमाणें भाव आणखी खालीं किती जातील, अथवा कुठें थांबतील, व वर केव्हां येतील असे अधीर प्रश्न प्रत्येकजण विचारत आहे. याला निश्चित उत्तर फक्त ब्रह्मदेवच देऊं जाणे; पण सामान्य अनुभवी दलाल असें सांगूं शकेल कीं आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं एकदा बाजार खालीं जाऊं लागला कीं आणखी त्याखालची पातळी लोकांना दिसते. यांच्या उलट वर जाऊं लागला कीं वरची मर्यादा दिसते. अपोलोसारखा शेअर मागील वर्षी ८ रु. २ आ. पर्यंत गेला होता तो परवां ३ रु. ११ आ. इतका खालीं उतरला आहे. आतां तो याच्या खालीं जाणें म्हणजे ज्या गिरणींत मागील वर्षी ८० लाख नफा निघाला व चालू सालींहि ५० लाख निघणें शक्य आहे, जिनें ६ आणे व्याज दिलें व यंदा किमान ४ आणे देणें शक्य आहे, ज्या गिरणीचे चालकत्वाचे हक्क ४० लक्ष रुपयापर्यंत घेतले गेल्याचें समजतें ती गिरणी एकदम शून्यवत् अशी लोकांना भासूं लागली असा अर्थ होतो. यामध्यें सारासार विचारच शिल्लक रहात नाहीं असें म्हणावें लागतें. तेव्हां ज्यांना तह झाल्यामुळें हिंदी उद्योगधंदे मटकन् बसणार अशी भीति वाटत असेल त्यांनीं आपले शेअर्स खुशाल विकून टाकावेत. बाकीच्या मंडळींनीं दुहेरी मार खाण्याचे टाळून आपल्या शेअर्सना जळवांच्यावर चिकटून बसावें. दुहेरी मार बसतो तो असा कीं, आतां खूप पडले व आणखी नुकसान टाळावें म्हणून विकावयाचे व वरती आणखी दुप्पट मंदी करावयाची. येवढ्यांत बाजार वर जात आहेत म्हणून पुन्हा वरच्या भावांत मंदी कापावयाची व दुप्पट तेजी करावयाची. त्याला कुठें शेवटच नाहीं अशी स्थिति होते. यापुढील पंधरा दिवसांत जरी तह प्रत्यक्ष झाला तरी बाजार खालीं जाण्याचें थांबून वर यावयास लागतील व नच झाला आणि लढाई लांबणार असें दिसूं लागलें तर ते दुप्पट जोरानें वरती जातील. नुकसानींत विकणाऱ्यांनीं पुढें पैसे कोठे ठेवावयाचे हाही एक विचार करावा. जे चिकटून बसणार आहेत त्यांच्यामागें देशांतील एकूण वाढलेल्या चलनाचा फारच मोठा पाठिंबा आहे. कापड, सूत व लोखंड, पोलाद यांना आलेली भरभराट एकदम नाहींशी होणारी नाहीं ही लक्षांत घेण्यासारखी गोष्टही त्यांच्या बाजूनें आहे.

* * * *

टाटा आयर्न अँड स्टील कंपनी डिबेंचर्स काढणार आहे. अशी एक बातमी आहे, परंतु ती अधिकृत नाहीं. हीं डिबेंचर्स निघाल्यास तीं अल्प व्याजाचीं असणार व डिफर्डवाल्यांचा फायदा वाढणार हें स्पष्टच आहे.

### चिनी लोकांस अंगवळणी पडलेल्या आपत्ती

"चीनमध्यें सध्या विशेष घडामोडी चालू नाहींत असें सांगण्यांत येतें, तेव्हां मला मी चीनमध्यें असतांना एके दिवशीं झालेल्या गोष्टीची आठवण होते. सुमारें ४०० मैल चालून एक चिनी फौजेचा भाग आला होता. त्यांतील बहुतेक सैनिक तरुण शेतकरी होते व त्यांचा गणवेष अगदीं फाटून गेलेला आणि त्यांच्या बंदुका नामधारीच होत्या. हे सैनिक विश्रांति घेत असतां त्यांवर जपान्यांनीं अचानक हल्ला केला. तेव्हां १½ मैल लांबीचा रस्ता चिन्यांचे रक्तानें माखून गेला असल्याचें व खालच्या नदींत शेकडो मृत चिनी सैनिक पडले असल्याचें दृश्य मला दिसलें. मीं चिनी व जपानी वृत्तपत्रें चाळून पाहिलीं, त्यांत या झटापटीचा उल्लेखहि आढळला नाहीं! असे प्रसंग नेहमीच घडतात, त्यांत नवीन कांहींच नव्हतें. चीन अद्याप तगून आहे, त्याचें ही असामान्य गोष्ट हेंच मर्म आहे. चीन कोलमडून पडण्याची भाषा चुकीची आहे.":–एका ब्रिटिश लेखकाच्या, स्वतःच्या अनुभवावर आधारलेली ही हकीकत चीनमधील परिस्थितीवर चांगला प्रकाश पाडील.

### रावेर पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल २१,२२५ रुपयांचें असून ५,३४८ रुपयांचे रिझर्व्ह व इतर फंड आहेत. ठेवी १,२६,४८७ रुपयांच्या आहेत. ५९,८२१ रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. "स्थावर व अंगावरील कर्जांचा व्यवहार पाहिजे तितका समाधानकारक नाहीं. मुदतमागणीकडेच सभासदांची प्रवृत्ति आहे. हें ठीक नाहीं." वर्ष अखेर बँकेस १,७३७ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांस ५% डिव्हिडंड मिळेल. चालू सालीं रावेर म्युनिसिपॅलिटीनेंहि मु. ठेव बँकेंत ठेवली आहे. राजे जे. आर. देशमुख, बी. एससी. ॲग्रि. हे बँकेचे अध्यक्ष व श्री. श्री. ना. उपळीकर हे सेक्रेटरी आहेत.

### नवव्या वर्षांत पदार्पण

पूना गेस्ट हाउसनें अनंत चतुर्दशीचे दिवशीं नववे वर्षांत पदार्पण केलें. के. सरपोतदार यांचे मागें त्यांची धर्मपत्नि व चिरंजीव यांनीं चिकाटीनें मजल गांठून गेस्ट हाउस महाराष्ट्रीयांचे आवडीचें केलें आहे. वरील दिवशीं श्रीसत्यनारायणाची पूजा करून शहरांतील प्रतिष्ठित नागरिकांस व आश्रयदात्यांस तीर्थप्रसाद दिला. उत्तम आदरातिथ्य व स्वच्छता इकडे स्वतः श्री. बंडोपंत हे जातीनें व्यवस्था पहात असतात. आम्हीं त्यांचे धंद्यांत त्यांना सुयश इच्छितों.

### पार्सलांत कोणती वस्तु घातली ?

पोस्टानें पाठविण्याच्या सर्व पार्सलांवर, तें पाठविणारानें आंत काय वस्तु आहे, हें स्पष्ट सांगणारा मजकूर पार्सलावर लिहिला पाहिजे, असा नियम झाला आहे.

### एका वर्षांत ८ हजार खास लष्करी आगगाड्या

३१ मार्च, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी हिंदी रेल्वेजनीं ८,००० लष्करी खास आगगाड्या सोडल्या व त्यांनीं ५४,००,००० मैलांचा प्रवास केला.

### व्यापार मंत्र्यांकडे शिष्टमंडळ

पेपर कंट्रोलर ( एकॉनॉमी ) ऑर्डरमुळें विमा कंपन्यांची कागदाबाबत कशी कुचंबणा होत आहे, हें हिंदुस्थान सरकारच्या व्यापार मंत्र्यांचे कानावर घालण्यासाठी आयुर्विमा कंपन्यांच्या संस्थेचें एक शिष्टमंडळ जाणार आहे.

# स्फुट विचार

### हिंदुस्थानास योग्य स्थान कां नाहीं ?

जागतिक चलन–परिषदेंत हिंदुस्थानच्या सूचना कशा फेटाळल्या गेल्या ह्याचा वृत्तांत हिंदी प्रतिनिधींनींच दिला आहे त्याचें दिग्दर्शन आजच्या अग्रलेखांत आम्हीं केलें आहे. त्यांनीं दिलेली सर्वच माहिती अत्यंत बोधप्रद असल्यानें तीमधील कांहीं बाबींचा उल्लेख येथें करण्यांत येत आहे. जागतिक चलन व्यवस्थेच्या म्हणजे आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या आधाराची गंगाजळी निर्माण केली जाईल तिची एकूण रक्कम ८८० कोटि डॉलर्स राहील. तिच्यामध्यें सभासद राष्ट्रांनीं आपापल्या हिश्याची भरती करावयाची आहे. ही वाटणी निरनिराळ्या देशांच्या व्यापारी महत्त्वाच्या प्रमाणांत व्हावयास पाहिजे. पण ती ह्या सरळ तत्त्वावर करण्यांत आलेली नाहीं. अमेरिकेच्या हिश्शास २७५ कोटि, इंग्लंडच्या १३० कोटि, सोव्हिअट राशियाच्या १२० कोटि, चीनच्या ५५ कोटि, व हिंदुस्थानच्या ४५ कोटि ह्या रीतीनें वाटणी झाली आहे. हिंदुस्थानचें स्थान तींत सहावें आहे आणि त्यांच्या हिश्शाच्या प्रमाणांत पहिल्या पांच राष्ट्रांस गंगाजळीची व्यवस्था पाहणाऱ्या कारभारी मंडळांत कायमची जागा मिळावी असें ठरवण्यांत आल्यानें हिंदुस्थान त्यांतून गळला आहे. चीनचा नंबर ह्या देशाच्या वर कसा लागतो हें समजणें कठीण आहे. केवळ आर्थिक कसोटी ह्या बाबतींत लावली जाणें योग्य होतें आणि तसें झालें असतें तर हिंदुस्थानास कारभारी मंडळांत जागा सहज मिळाली असती. पण ह्या प्रश्नाचा निकाल केवळ राजकीय दृष्टीनें केला गेल्यामुळें हिंदुस्थानास अन्याय झाला आहे असें श्री. श्रॉफ व सर षण्मुखम् चेट्टी ह्यांचें म्हणणें आहे.

---

### शेती सुधारणा आधीं, कीं औद्योगिक सुधारणा आधीं ?

प्रोफेसर ए. व्ही. हिल, ह्यांनीं हिंदी लोकांच्या उद्धारासंबंधीं व्यक्त केलेल्या विचारांत शेती सुधारणेस विशेष महत्त्व दिलेलें आहे, हें प्रसिद्धच आहे. औद्योगीकरणाचीच हिंदुस्थानास मुख्यतः गरज आहे, ही समजूत चुकीची असून लोकसंख्येची वाढ, आरोग्य, शेती, अन्नपुरवठा हे प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत, असें त्यांचें सांगणें आहे. हिंदुस्थानांतील अन्नपुरवठ्याबाबत परिस्थिति, बंगालमधील दुष्काळ, इत्यादि गोष्टींमुळें शेतीच्या उत्पादनाची वाढ करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे, परंतु औद्योगीकरणास कमी महत्त्व दिलें जाणें ह्याचा अर्थ आजपर्यंतच्या हिंदी पुढाऱ्यांच्या मागणीस बाजूला सारणें असा होऊं नये, अशी दक्षता बाळगली गेली पाहिजे. शेतीप्रधान हिंदुस्थानास अद्याप शेतीचे बाबतच पुष्कळ व तात्काळ सुधारणा केली पाहिजे; उद्योगधंदे पुढें काढले तरी चालतील, हें खरें भासलें तरी पटत नाहीं, अशी आपली विचित्र स्थिति झाली आहे. "कारखाने शहरांतून एकत्रित झालेले चटकन नजरेस भरतात आणि कारखानदार श्रीमंत व वजनदार असतात" एवढ्यासाठी खेडेगावी लोकांकडे दुर्लक्ष करूं नका, असा प्रो. हिल ह्यांचा आग्रह आहे.

---

### स्वतःचें शेपूट पकडण्याचा कुत्र्याचा प्रयत्न

प्रो. हिल ह्यांची विचारसरणी खालील प्रमाणें आहे:–"हिंदी लोकसंख्येंत दरसाल ६० लक्षांची भर पडत आहे. कारखान्यांत इतक्या लोकांना काम मिळणें अशक्य असल्यानें, शेतीवर अवलंबून असणारांची संख्या वाढतच जाणार. शेती व अन्नाचें उत्पादन हा हिंदी प्रश्नाचा गाभा आहे; कारखान्यांची वाढ हा नव्हे. हिंदी लोकांपैकीं फक्त १२% व स्त्रियांपैकीं फक्त ५% लोकांचें लिहितां वाचतां येण्याइतकेंच शिक्षण झालेलें आहे, ही केवढी अडचणीची गोष्ट आहे ! हिंदी लोकसंख्या एकसारखी वाढत असल्याकारणानें, अन्नपुरवठ्याचा प्रश्न हा हिंदुस्थानास कायमचा जडलेला रोगच होय," असें प्रो. हिल म्हणतात. "सध्याच्या अन्नपुरवठ्यांत ५०% वाढ झाली, म्हणजे लोकांना साधारण बरें आरोग्य राखतां येईल. अन्नपुरवठा वाढला कीं आरोग्य सुधारेल आणि त्याचा परिणाम आणखी लोकसंख्येंत भर पडण्यांत होईल ! पुनः कालांतरानें उपासमार, मृत्यू आणि जनन ह्यांच्या चढाओढीस स्थिरता प्राप्त होईल, असें हें चक्र चालू राहून कुत्र्यानें स्वतःची शेपटी पकडण्याच्या प्रयत्नासारखाच आरोग्य व सुदृढता ह्यांचा प्रयत्न ठरणार हें स्पष्ट आहे." प्रो. हिल ह्यांच्या मतें, हिंदी प्रश्नाचें स्वरूप असें आहे आणि संततिनियमन हाच त्यावर तोडगा आहे असें ते म्हणतात. इंग्रज स्त्रियांपेक्षां हिंदी स्त्रिया दुप्पट अर्भकांना जन्म देतात. त्यांपैकीं निम्म्यांस २२ व्या वर्षाचे अगोदरच मृत्यु येतो, हें खरें असलें तरी त्यांना लोकसंख्येंत भर टाकण्यास सातआठ वर्षे मिळतातच. मनुष्याची आर्थिक स्थिति सुधारली म्हणजे जननसंख्या कमी होत जाते असा सर्वत्र अनुभव आहे. परंतु हिंदुस्थानांत अनुभव उलट येतो, असें सांगताना प्रो. हिल ह्यांनीं कांहीं आकडे दिले आहेत, ते उद्बोधक आहेत. पंजाब हा हिंदुस्थानांतील सर्वांत श्रीमंत प्रांत आहे; तेथें जननाचें दर हजारीं प्रमाण ४१ आहे; सबंद हिंदुस्थानचें सरासरी प्रमाण ३४ आहे व बंगालमधील सरासरी प्रमाण ३० आहे. तेव्हां हिंदी लोकांचें नीट पोषण होऊन त्यांचें आरोग्य सुधारलें तर हिंदी लोकसंख्येच्या पोटापाण्याचा प्रश्न अधिकच बिकट होणार, असें आम्हीं समजावयाचें काय ?

---

### इंग्लंडची मदत घ्याः राजकीय गोष्टी घुसडूं नका

औद्योगीकरणामुळें जननसंख्या उतरली, तरी जोंपर्यंत हिंदुस्थान हा देश शेतीप्रधान रहाणार तोंपर्यंत ही बाब फार परिणामकारक ठरणार नाहीं. "शिक्षण, विशेषतः स्त्रियांचें शिक्षण ह्या कामीं उपयोगी ठरेल" असें प्रो. हिल म्हणतात. त्याला किती वर्षे लागतील ! शास्त्रशुद्ध शेती, सरकारी नियंत्रण व सामाजिक रूढी ह्यांत आमूलाग्र बदल ह्यांचेशिवाय हिंदी शेतकऱ्यांस उर्जितावस्था येणार नाहीं, असें सांगून प्रो. हिल म्हणतात, "आनंद, भरभराट, जगांतील राष्ट्रांत मानाचें स्थान, इत्यादि हिंदुस्थानाचे वाट्यास येऊं शकतील, परंतु त्यासाठी कडक उपाययोजना, सक्त मेहनत, शास्त्रीय पद्धति इत्यादींचा अवलंब केला पाहिजे; देशांतील सर्व लोकांत सहकारी वृत्ति हवी व सुधारणांचा अंगीकार करण्याची लोकांची तयारी पाहिजे. इंग्लंड मदत करण्यास तयार आहे; आकलन व परिशीलन ही त्याची पहिली पायरी आहे; राजकीय द्वेष व भांडणें टाळणें ही दुसरी पायरी आहे आणि इंग्लंडनें आपल्या अनुभ-

बाचा व सहायाचा फायदा हिंदुस्थानास देणें ही तिसरी व असेरची पायरी आहे." प्रो. हिल ह्यांच्या म्हणण्याचा मथितार्थ असा: हिंदी लोकांनीं आपल्या जगण्याचा व पोटापाण्याचा प्रश्न सोडविणें हें त्यांचें आद्य कर्तव्य आहे. हें कार्य दुर्घट आहे व त्याकरितां इंग्लंडची मदत आवश्यक आहे. इंग्लंड ती देईल, परंतु हिंदी लोकांनीं राजकीय बाबी घुसडून देऊन इंग्लंडचा सहकार्याचा हात दूर करूं नये. म्हणजे सुबत्ता शक्य होईल. औद्योगिक प्रगति मागाहून करतां येईल. हें सर्व घडून येण्यास फार दीर्घ काळ लागेल. प्रो. हिल ह्यांनीं स्पष्टपणें मांडलेले हे विचार निःसंशय विचारास चालना देणारे आहेत.

---

### महाराष्ट्र बँकेच्या भांडवलांत वाढ

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची १९३५ सालीं स्थापना झाली, त्यावेळीं तिचें अधिकृत भांडवल १० लक्ष रुपये व विक्रीस काढलेलें भांडवल ५ लक्ष रुपये होतें. हे सर्व भाग खपून गेल्यानंतर १९४२ च्या अखेर शिल्लक राहिलेले ५ लक्ष रुपयांचे भाग प्रत्येक ५० रुपयांच्या भागावर ५ रुपये वाढाव्यानें विक्रीस काढण्यांत आले, तेहि सर्व खपून बँकेचें वसूल भांडवल ५ लक्ष रुपये झालें व रिझर्व्ह आणि इतर फंड १ लक्ष, ८ हजार रुपयांवर गेले. अशा रीतीनें शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल होण्यास महाराष्ट्र बँक पात्र झाली. बँकेचें अधिकृत भांडवल आतां ५० लक्ष करण्यांत येत आहे व त्यांतून विक्रीस आणखी भांडवल काढलें जाईल. अशा रीतीनें, महाराष्ट्र बँक आपल्या स्वतःच्या भांडवलाचा पाया अत्यंत मजबुत करीत असून, आगामी बँकिंगचा कायदा व युद्धोत्तर परिस्थिति ह्यांस यशस्वी तोंड देऊन झपाट्यानें प्रगति करण्याची तिची तयारी आहे. भागीदारांस मिळणारा ४½% कर-माफ डिव्हिडंडचा दर सुरक्षित भांडवल गुंतविणारांस आकर्षक असाच आहे. वाढत्या भांडवलाबरोबर भागीदारांची कमाल मतसंख्याहि सध्याच्या १०० ची २५० करण्यांत यावी आणि डायरेक्टर होण्यास सध्या ५ हजार रुपयांचे १०० भाग पुरतात ते १२½ हजार रुपयांचे २५० लागावेत, अशीहि बोर्डाची सूचना आहे. बँक स्थापन होतेवेळीं कमाल मतसंख्या २५ होती व डायरेक्टरास सध्याप्रमाणेंच १०० भाग घ्यावे लागत होते. बँकेच्या मेमोरँडम व आर्टिकल्समध्यें त्याप्रमाणें दुरुस्त्या करण्यासाठीं बँकेची विशेष साधारण सभा ता. ८ ऑक्टोबर रोजीं बोलावण्यांत आली आहे. बँकेच्या मुंबई, डेक्कन जिमखाना, जळगांव, नागपूर, गिरगांव (मुंबई) व सडकी येथें शाखा आहेत.

---


## पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे भागीदार यांस

## नोटीस

आपल्या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २४ सप्टेंबर १९४४ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरून तींत वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा वांटणी, पोटनियम दुरुस्ती, डायरेक्टरांचे बोर्ड व हिशेब तपासनीसांच्या निवडणुकी वगैरे वार्षिक साधारण सभेचीं नेहमींचीं कामें करण्यांत येतील. डायरेक्टर व हिशेब तपासनीस यांची निवडणूक सदर इमारतींत होणार असून मतें देण्याची वेळ सदर दिवशीं सकाळीं ९ ते १२-३० अशी ठेवली आहे. तरी सभासदांनीं जरूर यावें अशी विनंति आहे. कळावें,
तारीख १ सप्टेंबर, १९४४.

बोर्डाचे हुकुमावरून,
द. दि. चितळे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

---

# भक्ताच्या अंगास घाम सुटतांच भगवंताची मूर्ती पाझरूं लागली !

व्ही. शांताराम आणि राजकमल यांची दुसरी कलाकृति

प्रोड्यूसर:— व्ही. शांताराम.
दिग्दर्शक:— केशवराव दाते.

# भक्तीचा मळा (माली)

भूमिका:— ● मास्तर कृष्णराव ● बेबी नलिनी ● अमीर कर्नाटकी ● अमीना ● सामंत ● राजा पंडित

## —: ७ वा आठवडा ! :—

**डेक्कन**— दररोज २ खेळ ७ व १० वा.
दर शनि. रवि. सोम. जादा खेळ दुपारीं ४ वाजतां
सर्व खेळ मराठी "भक्तीचा मळा"

**अपॉलो**— रोज रात्रौ ११ वाजतां फक्त मराठी
"भक्तीचा मळा"

रिझर्व्हेशन फक्त दर शनि. व रविवारीं —x— फ्री कॉम्प्लिमेंटरी व कन्सेशन पासेस अजिबात बंद !

## इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचा विस्तार

**९६ उपकंपन्या—१०॥ कोटि पौंड ठोक उत्पन्न—संशोधनासाठी १९०० शास्त्रज्ञ व सालिना २२ लक्ष पौंड खर्च**

इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजच्या अंतरंगाविषयीं व तिच्या कार्यविस्ताराविषयीं माहिती "अर्था" मध्यें नुकतीच देण्यांत आली आहे. ह्या कंपनीचे हातपाय हिंदुस्थानांत पसरण्याचीं चिन्हें दिसत आहेत. कंपनीनें आपलें बस्तान येथें बसविलें, तर हिंदी हितसंबंधांस त्यामुळें केवढ्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्यास तोंड द्यावें लागेल, ह्याची कल्पना इं. के. इंडस्ट्रीजच्या ताज्या अहवालांतील आकड्यांवरून येईल. कंपनीची सातवी वार्षिक सभा लंडनमध्यें नुकतीच भरली होती. १९४३ चे ताजे आंकडे त्यावेळीं उपलब्ध नव्हते, म्हणून १९४२ चेच आंकडे भागीदारांस सांगण्यांत आले. कंपनीच्या उपकंपन्यांची संख्या ९६ आहे, त्या सर्वांना व मुख्य कंपनीला मिळून १०½ कोटि पौंड उत्पन्न झालें. कच्चा माल, कारखाने चालविणें, वहातूक खर्च, व्यवस्थेचा खर्च, इत्यादींवर ५½ कोटि पौंड खर्च झाले व ३५ लक्ष पौंड घसाऱ्यासाठी बाजूस काढण्यांत आले. ४½ कोटि पौंड नफा उरला. त्यांत कंपनीची मालमत्ता, गुंतवणूक व इतर बाबींवरील १५ लक्ष पौंडाचें उत्पन्न मिळविलें म्हणजे उत्पादन व विक्री ह्यांवरील खर्च भागून ४ कोटि, ७० लक्ष पौंड रकम उरते. मजुरी, पगार, पेन्शनें, कर, इत्यादि भागवून ४० लक्ष पौंड निव्वळ नफा उरला, त्यांतील ३० लक्ष पौंड भागीदारांस वाटण्यांत आले.

### संशोधनावरील खर्च

संशोधन व वाढ ह्याकडे चांगलें लक्ष पुरविण्यावरच इं. के. इंडस्ट्रीज लि. सारख्या कंपनीची भरभराट अवलंबून आहे. १९४३ सालीं कंपनीनें ह्या बाबींवर २२ लक्ष पौंड खर्च केला! ९०० शास्त्रज्ञ कंपनीच्या प्रयोगशाळांतून काम करीत आहेत व त्यांचे हाताखालीं वाकबगार असे १,००० सहायक आहेत.

### कंपनीवरील कडक टीका

"कंपनीवर होणाऱ्या कडक टीकेचें मूळ अज्ञान हें असून त्या टीकेची पार्श्वभूमि राजकीय आहे. "मोनॉपॉली" हा शब्द कंपनीचे व्यवहाराबाबत वापरण्यांत येतो. ह्या टीकेस माझें उत्तर असें, कीं कंपनीच्या भागीदारांची संख्या १,८०,००० आहे व कंपनीच्या नोकरींत १,००,००० नोकर आहेत. औद्योगिक प्रगति, विस्तार, नोकरवर्गाच्या परिस्थितींत सुधारणा, आमच्या गिऱ्हाइकांचा वाढता संतोष व भागीदारांस योग्य डिव्हिडंड ह्यांकडेच कंपनीचे मुख्य लक्ष आहे; नफेबाजीकडे नाहीं." कंपनीच्या अध्यक्षांचें लोकांच्या टीकेस वरील प्रकारचें उत्तर आहे. उत्पादन मर्यादित करून किंमती भारी ठेवण्याबद्दलहि कंपनीस दोष देण्यांत येतो, परंतु तोहि निराधार आहे, असेंहि अध्यक्षांनीं सांगितलें.

---

### भारत संरक्षण कायद्याखाली बद्ध केलेल्या नोकरांना भरपगारी रजा

डिफेन्स ऑफ इंडिया रूल्सखाली बद्ध केलेल्या, कलकत्ता कॉर्पोरेशनच्या सर्व नोकरांना ते मुक्त होईपर्यंत सर्व मुदतीची संबद्ध पगाराची खास रजा देण्यांत यावी, असा ठराव कलकत्ता कॉर्पोरेशननें केला आहे.

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
लायसॉफ
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग
दि मामोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
पेन्टर बेडेकर, ए. जी.,
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.
A 9
क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा
अनुभविक उपाय म्हणून
'एनाईन' वापरतात.
अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे
( सहाय खात्यानें मान्यता दिलेले )

**टोमॅटो केचप ( गोड ) व**
**टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]**

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**
बिझिनेस ऑफिसः १११ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
**मै ला चा — द ग ड**
सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर

**दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.**
( स्थापना : १९१९ )
आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
**मोति माणिक मॅन्शन,**
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
**मेहता हाऊस,**
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**
( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.